# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहिरात

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून **महाराष्ट्र शासन मान्यतेच्या अंतरावर** नवीन विषय/अभ्यास पाठ्यक्रम/ अतिरिक्त तुकडया/प्रवेशक्षमता वाढ/पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यता, संशोधन केंद्र, संशोधन संस्था व खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्था सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत तसेच महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत व महाविद्यालयाच्या / परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करणेबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation.→AffiliationT-2 'Information/Lists' या लिंकवर विस्तृत जाहिरात, माहितीपत्रक, शासन निर्णय ठेवण्यात आली आहे. व त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची वार्षिक योजना शासन मान्यतेच्या अधीन आहे. मात्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ ४ (क) मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था यांनी दि.३०/०९/२०२३ रोजी पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) विद्यापीठ कार्यालयीन वेळेत प्रस्ताव व शुल्क सादर करणे आवश्यक आहे.

**प्रथम शुल्क बँकेत जमा करुन प्रस्ताव दि.३०/०९/२०२३ नंतर सादर करता येणार नाही. तसेच शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी या कार्यालयास दि.३०/०९/२०२३ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही.**

सही/-

क्र.शिवाजीवि/संलग्नता/टी-२/९८७
दिनांक : १४/०९/२०२३

डॉ. व्हि. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## जाहिरात

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये (कोल्हापूर/सांगली व सातारा जिल्हे) बृहत आराखडयामधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन मान्यतेच्या अंतरावर नवीन विषय/अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडया/पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यता, एम.फिल.,पीएच.डी. संशोधन केंद्र, संशोधन संस्था व खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्था सुरू करण्यासाठीच्या प्रस्तावांबाबत तसेच महाविद्यालयांच्या नावातील बदलासंदर्भातील प्रस्तावांबाबत व महाविद्यालयाच्या / परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण करणेबाबतचा प्रस्ताव इच्छुक शिक्षण संस्थांना व संलग्नीत महविद्यालयांना कळविण्यात येते की-

१) जी संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन विषय / नवीन अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडया / एम.फिल., पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यता, पीएच.डी. संशोधन केंद्र सुरू करू इच्छितात, अशा संलग्नीत महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त संस्थांनी सदरचे प्रस्ताव बृहत आराखडयामधील तरतुदीनुसार प्रस्तावित ठिकाणांसाठी विद्यापीठाच्या व शासनाच्या विहित नमुन्यामध्ये विहित शुल्कासह कार्यालयीन वेळेत ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत विद्यापीठात सादर करावेत.

२) बृहत आराखडा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation.→Affiliation T-2'Information/Lists' या लिंकवर उपलब्ध आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०९ (४) (क) नुसार बृहत आराखडयामधील तरतुदीप्रमाणेच प्रस्ताव स्विकारले जातील.

३) दि.१३ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयानुसार (शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दि.१३ सप्टेंबर,२०१७) बृहत आराखडयातील तरतुदीनुसार नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, अतिरिक्त तुकडया सुरू करण्यासंदर्भात शासनाने विहित केलेला अर्जाचा नमुना (परिशिष्ट 'अ') तसेच अर्जासोबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची सुची (परिशिष्ट 'ब') विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावरील लिंकवर उपलब्ध आहे. तसेच विद्यापीठाच्या विहित अर्जाच्या नमुन्यामध्येही आवश्यक त्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यानुसार सर्व बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्विकारले जातील. (शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दि.१३ सप्टेंबर, २०१७ मध्ये नमुद परिशिष्ट 'ब' नुसारच सर्व कागदपत्रे त्या क्रमाने पाठपोट पृष्ठ क्रमांक लिहून सादर करावीत.)

४) विद्यापीठाच्या विहित अर्जामधील प्रस्ताव फक्त मुळ प्रतीमध्ये व दि.१३ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयातील अर्जाच्या विहित नमुन्यामधील प्रस्ताव; परिशिष्ट 'ब' मधील आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतींमध्ये सादर करावेत. सदरची कागदपत्रे परिशिष्ट 'ब' मध्ये नमुद केलेल्या अनुक्रमांकानुसारच प्रस्तावास जोडण्यात यावीत. तसेच सदरचे प्रस्ताव DVB-TTSurekh या फॉन्टमध्ये MS Word मध्ये newproposal.affit2@unishivaji.ac.in या ई-मेल वर पाठविण्यात यावे किंवा सॉफ्ट कॉपी पेनड्राईव्हमध्ये देणे.

५) प्रस्तावाच्या मुखपत्राचा (Covering Letter) नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Affiliation लिंकवर उपलब्ध आहे. फक्त त्या नमुन्यातच प्रस्तावांचे मुखपत्र (Covering Letter) स्विकारले जाईल.

६) शिखर संस्थांशी संबंधीत प्रस्ताव बृहत आराखडयामधील तरतुदीनुसारच स्विकारले जातील.

७) जमा करण्यात येणाऱ्या प्रस्तावाचे शुल्क विद्यापीठाच्या ऑनलाईन रिसिप्ट याव्दारे भरण्यात यावे.

८) प्रथम शुल्क बँकेत जमा करुन प्रस्ताव दि.३०/०९/२०२३ नंतर सादर करता येणार नाही. तसेच शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी या कार्यालयास दि.३०/०९/२०२३ रोजी पर्यंत **हस्तेपोहोच** करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे प्रस्ताव फक्त विद्यापीठ कार्यालयीन वेळेतच पोहोच होणे आवश्यक आहे. विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क स्विकारले जाणार नाही. **तसेच पोस्टामार्फत व अन्य सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**

**९) शासन नियुक्त तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच माहेडच्या अंतिम मंजुरीच्या अंतरावर पात्र अर्जांचा विचार केला जाईल.**

१०) ज्या महाविद्यालयांना त्यांच्या सध्याच्या नावात बदल करावयाचा असेल त्यांनी महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतचे प्रस्ताव विहित नमुन्यात विहित शुल्कासह दि.३० सप्टेंबर,२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यापीठात सादर करावेत.

क्र.शिवाजी वि/संलग्नता/टी-२/९८७
दिनांक : १४.०९.२०२३

सही/-
डॉ. व्हि. एन. शिंदे,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

D:\SSV\Shasan T. 2023\2024-25 - Advertisment Process - Dt.12.09.2023\2024_2025_Navin Vishay Abhyaskram Advertisement And Submission.Docx